दैनिक
# महा मेट्रो

वर्ष ४ रे : अंक : ६ पुणे, मंगळवार, २३ डिसेंबर २०२५ पाने : ४ किंमत : ३.००
RNI NO.MAHMAR2022/87390
VOL NO.4. ISSUE : 6 Pune, Tuesday, 23 December 2025 Pages : 4 PRICE : 3.00

...आणि मुलाखतीची वेळ संपली
पान २



## मनोरंजन क्षेत्रात किती जीएसटी वसुली होते या बाबत

# वस्तू व सेवा कर कार्यालय अनभिज्ञ

**करमणुक कर संपुष्टात आल्यानंतर मल्टीप्लेक्स च्या माध्यमातून किती जीएसटी मिळते याची माहितीच नाही**




**पुणे :** देशात १ जुलै २०१७ पासून एक राष्ट्र एक कर प्रणाली अर्थात जीएसटी सुरू करण्यात आली. यामध्ये सेवा उद्योगाला २८ टक्के जीएसटी कर प्रणाली लागू करण्यात आली. यामध्ये चित्रपटाचा समावेश होतो. पूर्वी करमणूक कर विभाग होता. करमणूक कर चाळीस ते पंचेचाळीस टक्के पर्यंत असायचा. आता मात्र मल्टीप्लेक्स च्या माध्यमातून २८ टक्के जीएसटी आकारली जाते. दरवर्षी काही चित्रपट बॉक्स ऑफिसवर शेकडो कोटी रूपयांचा व्यवसाय करतात. त्यामुळे चित्रपटाच्या माध्यमातुन किती करमणूक कर अर्थात जीएसटी वसुल झाली याची माहितीच वस्तू व सेवा कर कार्यालयाला नसल्याचे दिसून आले.

चित्रपटाच्या माध्यमातून राज्य सरकारला कोट्यवधी रूपयांचा महसूल मिळत होता. त्यानंतर मल्टीप्लेक्सचे युग आले . सुरवातीला मल्टीप्लेक्सला करमणूक करात सवलत देण्यात आली होती. त्यामुळे मल्टीप्लेक्सची संख्या वाढली. ज्या एक पडदा थिएटर मालकांनी आणखी एक दोन स्क्रीन वाढवून त्याचे रूपांतर मल्टीप्लेक्स मध्ये केले. त्यानंतर १ जुलै २०१७ पासून जीएसटी कर प्रणाली केल्यानंतर करमणूक कराचे रूपांतर जीएसटी मध्ये झाले. त्यामुळे मल्टीप्लेक्सवर २८ टक्के जीएसटी आकारले गेले. तर शंभर रूपयांपर्यतच्या तिकिटावर १८ जीएसटी आकारण्यात येऊ लागले.

राज्यभरातील एक पडदा थिएटरवर दीड दशकापूर्वी मल्टीप्लेक्समुळे संक्रांत आली . एका बाजुला करमणूक कराचा बोझा तर दुस-या बाजुला विविध टीव्ही चॅनल्समुळे एक पडदा थिएटर बंद पडू लागले. त्यानंतर आलेल्या ओटीटी प्लॅटफॉर्ममुळे तर चित्रपटगृहाकडे प्रेक्षकांनी पाठ फिरवली. मात्र नवनवीन तंत्रज्ञानावर आधारीत आलेले देश व विदेशातील चित्रपटामुळे प्रेक्षक मल्टीप्लेक्सकडे पुन्हा वळला. त्यामुळे काही चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर शेकडो कोटी रूपयांचा व्यवसाय केला. तर अनेक एक पडदा थिएटरने मल्टीप्लेक्समध्ये रूपांतर केले. त्यामुळे रुपेरी पडद्याला सुवर्णकाळ आला.

राज्यभरात पिव्हीआर, सिनेपोलिस सिनेमा, आयनॉक्स, इ स्क्वेअर, सिटी प्राइड अशा मल्टीप्लेक्स जाळे विस्तारले गेले आहे. या मल्टीप्लेक्स मध्ये तिकिटं दर चारशे ते हजार रुपयांपर्यंतचे दर आहेत. या तिकिटाच्या २८ टक्के जीएसटी शुल्क वस्तू व सेवा कर कार्यालय आकारते. त्यामुळे दर वर्षी शेकडो कोटी रूपयांचा महसूल केंद्र व राज्य सरकारकडे जमा होतो. मात्र , ही रक्कम किती जमा होते याची माहितीच वस्तू व सेवा कर कार्यालयाला नसल्याचे समोर आले आहे.

### मल्टीप्लेक्स ऐवजी फर्मची नावाने जीएसटी क्रमांक

शहरात डझनभर मल्टीप्लेक्स आहेत. मात्र जीएसटी कार्यालयात कंपनीच्या फर्मच्या नावाने जीएसटी क्रमांक आहे. त्यामुळे येथील खाद्य पदार्थावरील कि सिनेमाच्या तिकिटावरील जीएसटी शुल्क आहे हे कळणे ग्राहकाच्या समजण्याच्या पलिकडे आहे. यामध्ये काही तरी गोलमाल असल्याचे दिसून येते. अनेक कंपन्यांनी जीएसटी वाचविण्यासाठी युक्ती शोधल्याचे दिसून येते.

### मल्टीप्लेक्स मध्ये खाद्यपदार्थ व शीतपेय महागडे

मल्टीप्लेक्स मध्ये विकले जाणारे खाद्यपदार्थ व शीतपेय हे महागडे असते. यावरील किंमती जास्त असतात. पॉपकॅार्न तीनशे ते सहाशे रूपये, समोसा पन्नास रुपये तर पाण्याची एक लिटर बाटली पन्नास रूपये दराने विकली जाते. त्यावर मात्र १२ टक्के जीएसटी शुल्क आकारले जाते. त्यामुळे ही रक्कम सुद्धा सरकारकड जमा होते. याची माहिती मात्र जीएसटी कार्यालयाकडे नाही.

> वस्तू व सेवा कर कार्यालयाकडे मल्टीप्लेक्सचे वर्षाला किती जीएसटी शुल्क जमा होतो याची माहिती नाही. जीएसटी विभागाने अनेक सेवा करांचे वर्गीकरण अद्याप केले नाही. असे वर्गीकरण केले असते तर मल्टीप्लेक्सकडून किती जीएसटी जमा होतो हे तत्काळ समजले असते.”
> – अतिरिक्त आयुक्त वस्तू व सेवा कर, पुणे विभाग



येरवडा - येरवडा मेट्रो स्टेशन मुळे येरवड्याचा कायापालट होणार आहे

## महाविकास आघाडी व महायुती आमनेसामने पण ‘एमआयएम‘मुळे
# समिकरण बिघडणार ?

### वैयक्तिक नेतृत्वाचा लागणार कस

**प्रभागाचा लेखा- जोखा**
**येरवडा-गांधीनगर**

**येरवडा :** वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघात प्रभाग क्रमांक सहा हा सर्वाधिक वस्त्यांची संख्या आहे. येरवडा प्रभाग धर्मनिरपेक्ष म्हणून ओळखला जातो. सुरवातीला काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला होता. त्यानंतर शिवसेनेचे तीन नगरसेवक निवडून आले. पुणे महापालिका स्थापन झाल्यापासून भारतीय जनता पक्षाचा एकही उमेदवार येरवड्यातून विजयी झालेला नाही. त्यामुळे यंदा भाजप-शिवसेना एकत्र येऊन इतिहास घडविण्याच्या प्रयत्नात आहे. मागील वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत येरवड्यातील मतदारांनी महायुतीच्या विरोधात मतदान केले. त्याचा फटका विधानसभेत सुनिल टिंगरे यांना बसला त्यांचा अवघ्या दीड ते दोन हजार मतांनी पराभव झाला. महाविकास आघाडी चे अर्थात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ( शरद पवार) बापूसाहेब पठारे विजयी झाले होते.

सुरेंद्र पठारे यांच्या भाजपा प्रवेशामुळे फार काही येरवड्यातील राजकीय समीकरणे बदलणार नाही. शिवसेनेचे संजय भोसले यांचा प्रभागाती मोडतोड केल्यामुळे त्यांचा व्होट बँक कमी झाल्यामुळे मतदार पुन्हा एकदा शिवसेनेला साथ देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यामध्ये मशाल कि धनुष्यबाण या संभ्रमात भोसले आहेत.

महापालिकेच्या सन २०१७मध्ये झालेल्या निवडणुकीत शिवसेनेचे संजय भोसले, अॅड. अविनाश साळवे, श्वेता चव्हाण आणि 'एमआयएम' पक्षाच्या अश्विनी लांडगे विजयी झाल्या होत्या. महापालिका निवडणुकीआधी नव्याने केलेल्या प्रभागरचनेत येरवड्यातील जय जवाननगर आणि लक्ष्मीनगरचा परिसर तोडून प्रभाग १३ जयजवाननगर - पुणे स्टेशनला जोडण्यात आला आहे. त्यामुळे शिवसेनेचे गटनेते आणि माजी नगरसेवक संजय भोसले यांची मोठी ताकद कमी झाली आहे. सध्याच्या प्रभागरचनेत येरवडा गावठाण, वडार वस्ती, गाडीतळ, कामराजनगर, सुभाषनगर, अशोकनगर, गणेशनगर, लक्ष्मीनगर, नवी खडकी, यशवंतनगर, नेताजीनगरसह नव्याने रस्त्याचा पलीकडील गांधीनगर आणि जयप्रकाश नगरचा समावेश करण्यात आला आहे.

सुरेंद्र पठारे यांनी भाजमध्ये प्रवेश केल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून निवडणूक लढविण्यास इच्छुक असणाऱ्या माजी नगरसेवकांनी तूर्तास 'वेट अँड वॉच'ची भूमिका घेतली आहे. शिवसेनेचे माजी नगरसेवक अॅड. अविनाश साळवे आणि 'एमआयएम'च्या माजी नगरसेविका अश्विनी लांडगे, डॅनियल लांडगे यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. आघाडी झाल्यास माजी नगरसेवक संजय भोसले एकत्र पॅनेल करून निवडणूकीला समोरे जाऊ शकतात. इतर मागासवर्गीय ( ओबीसी ) गटातून माजी नगरसेवक किशोर विटकर आणि हनीफ शेख निवडणुकीत समोरा- समोर येऊ शकतात. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून अजित गंगावणे आणि रूपेश गायकवाड पान ४ वर

### प्रमुख समस्या

१) सर्वच रहदारीच्या रस्त्यांवर पथारी व्यावसायिकांची अतिक्रमणे.
२) अतिक्रमणांमुळे रस्ते अरुंद झाल्याने वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त.
३) २० वर्षापासून नवीन भाजी मंडई रखडलेली.
४) लहान मुलांना खेळण्यासाठी मैदाने आणि उद्याने नाहीत.
५) देशी दारू आणि अमली पदार्थांचा मोठा व्यवसाय.

## वस्त्यांमधील शाळा गळतीचे मोठे प्रमाण

# व्यसनाधिनता व गुन्हेगारीची सुरवात

**‘शहरी वस्त्यांमधील दृष्टचक्र ’: भाग-१**

शहरीकरणामुळे नव्वदच्या दशकात पुणे व पिंपरी-चिंचवड मध्ये वस्त्यांची संख्या झपाट्याने वाढली. या वस्त्यांमध्ये महापालिकेच्या वतीने नळाव्दारे पिण्याचे पाणी, सांडपाणी व्यवस्था, स्वच्छतागृहे, गल्लीबोळातीक काँक्रिटीकरण, अंतर्गत रस्ते, पददिवे अशा मूलभुत सुविधा दिल्या. यासह मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरू करून मोफत शिक्षणाची सोय सुद्धा केली गेली आहे. शहरी वस्त्यांमध्ये डझनभर स्वयंसेवी संस्था (एनजीओ) काम करीत आहेत. तरी सुद्धा येथील शाळागळतीचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळे मुलांमध्ये आलेली व्यसनाधिनता, गुन्हेगारी, बेरोजगारी हे दृष्टचक्र काही थांबता थांबत नाही. अशा शहरातील वस्त्यांमधील सद्यस्थितीचा घेतलेला मागोवा.



**येरवडा :** शहरात ५३४ वस्त्या आहेत. यामध्ये महापालिका शिक्षण मंडळाच्या वतीने तीनशे पेक्षा जास्त प्राथमिक तर २२ माध्यमिक शाळांची संख्या आहे. या सर्व मराठी माध्यमांच्या शाळा अनुदानित असल्या तरी महापालिकेने २००० नंतर विनाअनुदानित इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरू केल्या. त्यामुळे मराठी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या झपाट्याने कमी होत गेली. तर इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील शिक्षकांच्या कौशल्य क्षमतेच्या अभावामुळे ते विद्यार्थ्यांना सहज आणि आनंददायी शिक्षण देण्यास कमी पडू लागले. त्यामुळे इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून इयत्ता सातवी व दहावी नंतर शाळा गळतीचे प्रमाण अधिक वाढले आहे.

शहरी वस्त्यांमधील महापालिकेच्या मराठी माध्यमांच्या शाळा विद्यार्थी संख्या काही प्रमाणात असल्यामुळे त्या टिकून राहिल्या. मात्र, आठवी पर्यंत विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करण्याच्या धोरणामुळे अनेक विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता घसरली. त्यांना नीट वाचता येत नव्हते कि गणितातील आकडेमोड जमत होते. त्यामुळे आठवी नंतर शाळा गळतीचे प्रमाण अधिक वाढले. पालकांचे विद्यार्थ्यांकडे असलेले दुर्लक्ष किंवा पालकच व्यसनाधिनतेमध्ये असल्यामुळे त्यांची मुले सहाजिकच व्यसनाधिनतेकडे वळले.

### शाळेच्या शंभर मिटर अंतराच्या आत पान टपऱ्या

शहरातील दाटलोकवस्तीमुळे वस्त्यांची सिमारेषा व येथील शाळांची सिमारेषा कळत नाही. त्यामुळे शाळेच्या अगदी लागून अनेक पान टपऱ्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना सहज गुटखा, सिगारेट आणि तंबाखु उपलब्ध होतेच असे नाही तर उपलब्ध करून दिले जात असे म्हणावे लागले. त्यामुळे अनेकांना विद्यार्थीदशे पासूनच गुटखा, सिगारेट व तंबाखुचे व्यसन लागते. वस्त्यांमध्ये गल्ली बोळात आता गांजा मिळत असल्यामुळे गुटखा व सिगारेटची जागा गांजाने घेतली आहे. शाळा गळतीचे वाढले प्रमाण , मुलांमधील व्यसनाधिनतेचा बेरोजगारीचा फायदा घेऊन अनेक गुन्हेगार टोळ्या अशा मुलांना लक्ष करून त्यांना टोळीमध्ये सहभागी करून घेत आहेत. त्यामळे वस्त्यांमधील अनेक अल्पवयीन मुले गांजाच्या आहारी गेले आहेत. अनेकजण उदरनिर्वाहसाठी गुन्हेगारी टोळयांमध्ये राहत आहेत. वस्त्यांमध्ये संघटीत गुन्हेगारांची संख्या वाढत असल्याचे वास्तव आहे.

### अल्पवयीन मुली गुन्हेगारी टोळींच्या संपर्कात

वस्त्यांमधील गरीब व सुंदर विद्यार्थीनींना हेरून त्यांना पैशाचे आमिष देऊन गुन्हेगारी टोळीच्या संपर्कात आणले जात आहे. त्यासाठी अनेक महिला दलाल कार्यरत आहेत. याचा थांगपत्ता ना स्थानिक पोलीसांना आहे ना लोकप्रतिनिधींना. गुन्हेगारी मुलींना पैसे, महागड्या मोबाईल, अमली पदार्थ देऊन त्यांना आपल्या टोळीत सहभागी करून घेतात. त्यांच्या मार्फत अमली पदार्थ पोचविण्याचे नेटवर्क तयार करतात. त्यामुळे कोणालाही त्यांचा संशय येत नाही.

### चेल्यांची वस्तीत दहशत

येरवड्यातील अनेक गुन्हेगारी टोळीचे प्रमुख येरवडा कारागृहात आहेत. मात्र , त्यांचे अल्पवयीन गुन्हेगार मुले वस्त्यांमध्ये दहशत निर्माण केले आहे. अमली पदार्थांच्या विक्रीमध्ये गुंतले आहेत. अमली पदार्थ विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात अल्पवयीन मुलींचा वापर केला जात असल्याचे दिसून येते. यामध्ये दलाल महिला वस्त्यांमधील गरिब व गरजू विद्यार्थींनींना जाळयात अडकवत असल्याचे समोर आले आहे. त्या दृष्टीने तपास करण्याची मागणी स्थानिक रहिवाशांनी केली आहे.

## संपादकीय....

# पुणे रिंगरोडच्या महत्त्वकांक्षी प्रकल्प पूर्ण कधी होणार ?

पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण ( पीएमआरडीए) पुणे रिंगरोड नाशिक, मुंबई, सोलापूर, सातारा आणि नगर अशा राष्ट्रीय महामार्गांना जोडणारा महत्त्वकांक्षी ८५ किलोमीटर लांबीचा प्रकल्प आहे. पश्चिम रिंग रोड व पूर्व रिंगरोड असे दोन भाग आहेत. एकुण चार टप्प्यांमध्ये होणाऱ्या रस्त्याच्या कामासाठी ८२ गावातील सुमारे १६०० हेक्टर जागेचे भूसंपादनाचे काम सुरू आहे. मात्र, भूसंपादनासाठी तीन हजार ६२८.२५ कोटी रुपय निधीची आवश्यकता आहे. तर दीड हजार कोटी रुपयांची तातडीने आवश्यकता.

पुणे रिंगरोडचे काम पश्चिम आणि पूर्व अशा दोनभागात सुरू आहे. पश्चिम रिंगरोडमध्ये ३४ गावांचा तर पूर्व रिंगरोड मध्ये ४८ गावांचा समावेश आहे. पश्चिम रिंगरोडसाठी साधारणत: सातशे हेक्टर जागेची आवश्यकता आहे. यामध्ये संमतीने ताब्यात २६० हेक्टर जागा आली असून सक्तीने निवाडे घोषित क्षेत्र ३७० हेक्टर आहे. मुळशी तालुक्यातील कासार अंबोली , भोर तालुक्यातील खोपी, तर हवेली तालुक्यातील प्रयागधाम (पेठ) या तीन गावांचे अलाइमेंट प्रलंबित आहेत.

पुणे रिंगरोडसाठी सहा हजार १०६कोटी रुपयांचा मोबदला जाहिर झाला आहे. यापैकी ‘ पीएमआरडीए’ ला दोन हजार ४८० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. तीन हजार ६२६ कोटी रुपये निधीची आवश्यकता असून त्यापैकी पुढील काही दिवसात दीड हजार कोटी रुपयांची तातडीने आवश्यक आहे.

पुणे रिंगरोड पुणे- नाशिक, मुंबई- पुणे - सोलापूर, पुणे- सातारा, पुणे- नगर अशा राष्ट्रीय महामार्गांना जोडणारा आहे. त्यामुळे पुणे शहर व परिसरातील औद्योगिक क्षेत्राचा विकास झपाट्याने होऊन मोठ्या प्रमाणात रोजगार संधी निर्माण होणार आहे. यासह रिअल इस्टेट क्षेत्रात हजारो गृह व व्यापारी संकुल उभे राहणार आहेत.

वाडेबोल्हाई येथील जागा रिंगरोड मध्ये गेली आहे. जागेच्या चौपट रकम मिळणार आहे. मोबदला लवकर मिळावा म्हणुन वकिल सुध्दा दिले आहे. मात्र , जिल्ह प्रशासन निधी संपले असल्याचे संबंधितांना सांगितले जात आहे.

**पहिल्या टप्पा :** थेऊर फाटा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९ वरील केसनंद-वाघोली- चऱ्होली- भावडी- तुळापूर- आळंदी ते राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० वरील केळगाव चिंबळी.

**दुसरा टप्पा :** चिंबळी-निघोज-सांगुर्डे-शेलारवाडी- चांदखेड- पाचने-रिहे- घोटवडे- पिरंगुट

**तिसरा टप्पा :** पिरंगुट- भूगाव-चांदणीचौक- आंबेगाव- कात्रज

**चौथा टप्पा :** कात्रज-मांगडेवाडी-वडाचीवाडी-होळकरवाडी-वडकीनाला-रामदरा - थेऊर फाटा



# ...आणि मुलाखतीची वेळ संपली

येरवडा मध्यवर्ती कारागृहातील मुलाखत कक्ष आधुनिक तरी परिस्थिती तशीच पुणे .

येरवडा मध्यवर्ती कारागृहात सेंट्रल ॲड्रेसिंग सिस्टीम् (मध्यवर्ती ध्वनीक्षेपक यंत्रणा) आहे. कारागृहातील सत्तर टक्के कच्चे कैदी आहेत. त्यामुळे एकाच वेळी ध्वनीक्षेपकावरुन त्यांच्यापर्यंत निरोप पोहचतो. त्यामुळे सकाळी दहा वाजता ज्या कैद्यांच्या नातेवाईकांची भेट होणार आहे, त्यांना ध्वनीक्षेपकावरुन मुलाखत कक्षाच्या बाहेर बोलावून रांगेत उभे केले जाते. त्यानंतर बाहेरील त्यांच्या नातेवाईकांना सुद्धा बोलावून रांगेत उभे केले जाते.पूर्वी एका लहानशा खोलीत ही मुलाखत होत असे. कैदी व भेटण्यासाठी येणाऱ्यांमध्ये तारेची जाळी असायची. एकाच वेळी वीस ते तीसजण बोलत असल्यामुळे कोणाचे कोणाला ऐकू येत नसायचे. एकमेकांच्या चेहऱ्यावरील हावभाव, डोळ्यांतील अश्रू, देहबोली यावरुनच त्यांच्यामध्ये सुरू असलेला संवाद हा आनंदाचा आहे की दु:खाचा हे कळायचे. त्यांना क्रोध झाला आहे की पश्चाताप हे कळायचे. शब्द कानावर न पडताच त्यांच्यातील संवाद काय सुरु आहे हे कळायचे. काही मिनिटांतच तुरुंग रक्षक मोठ्या आवाजात मुलाखतीची वेळ संपल्याचे ओरडून सांगायचा. त्यामुळे संवाद न होताच पुढील मुलाखतीला येण्याचे हातवारे करुन नातेवाईक व कैदी जात असत.



येरवडा मध्यवर्ती कारागृहात कैद्यांची संख्या साडेसहा हजारांहून अधिक झाली. राज्यातील सर्वाधिक कैदी संख्या असलेले येरवडा हे कारागृह आहे. या कारागृहात तब्बल साडेचार हजारांपेक्षा अधिक कच्चे कैदी आहेत. त्यामुळे त्यांना दररोज भेटण्यासाठी येणाऱ्या त्यांच्या नातेवाईकांची संख्या सुद्धा शेकडोने असते. ही मुलाखत सकाळी दहा ते बारा व दुपारी तीन ते पाच दरम्यान असते. त्यामुळे कारागृहाच्या बाहेर कैद्यांच्या नातेवाईकांची प्रचंड गर्दी असते. ता मुलाखत कक्षात कैदी आणि नातेवाईक यांच्यामध्ये अभेद्य ‘काच’ लावण्यात आली आहे. कैदी व त्यांच्या नातेवाईकांना बोलण्यासाठी स्पिकर व दूरध्वनीसारखी यंत्रणा उपलब्ध करुन दिली आहे. मात्र, कैदी संख्या पाहता आणि आलेल्या नातेवाईकांचा विचार करता काही क्षणातच ही मुलाखत संपते. या ठिकाणी कैद्यांची संख्या वाढल्याने मुलाखतीसाठी नातेवाईकांची प्रतिक्षा असते, म्हणून संवाद संपण्याच्या आधीच मुलाखतीची वेळ संपल्याची आरोळी तुरुंग रक्षक देतो.

येरवडा मध्यवर्ती कारागृहात कैद्याला जामीन दिला तर त्यांना कोण सांभाळणार, यामुळे त्यांचे नातेवाईक त्यांना जामीनच देत नाही. त्यामुळे कारागृह हे कैद्यांचे कायमचे घर झाले आहे. अशा कैद्यांची संख्या लक्षणीय आहे. अशा कैद्यांना ना कोणी भेटायला येतात, ना कोणी पत्र पाठवतात. त्यामुळे कारागृहातील त्यांचे जीवन एकाकीच असते. मात्र, दरवर्षी रक्षाबंधन कार्यक्रमाला येरवडा परिसरातील शाळेतील मुली किंवा स्वयंसेवी संस्थेतील महिला त्यांना राखी बांधण्यासाठी येतात, हीच एक त्यांच्यासाठी दिलासा देणारी घटना म्हणावी लागेल. राख्या बांधताना त्यांना अश्रू आवरता येत नाही. अशा एक ना अनेक घटनांचा साक्षीदार येरवडा मध्यवर्ती कारागृह आहे.

> येरवडा मध्यवर्ती कारागृहातील आधुनिक मुलाखत कक्षात एकाच वेळी २२ कैदी व त्यांचे नातेवाईक संवाद साधु शकतात. आणखी दहा कैद्यांना संवाद साधता येईल अशी सोय करण्यात येणार आहे. प्रत्येक कैदी व त्याचे नातेवाईक यांना संवाद साधण्यासाठी दहा ते वीस मिमिटाचा कालावधी देण्यात येतो. नातेवाईक जास्त आल्यास मुलाखतीचा वेळ कमी केला जाऊ शकतो.”
>
> - अधिक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह

# न्यायवैधक शास्त्रातील महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या नवीन 'बीटल’ (किटक) चा शोध

## मोरेश्वर कलावटे ( ओमोर्गस) प्राणी किंवा मानवाच्या मृत्यूची वेळ शोधणार

फॉरेन्सिक सायन्स अर्थात न्यायवैधक शास्त्रात अतिशय महत्त्वाच्या असलेल्या बीटलच्या (किटक) नवीन प्रजातीचा शोध लागला आहे. भारतीय प्राणीशास्त्र सर्वेक्षण (झेडएसअ) विभागातील शास्त्रज्ञ डॉ. अपर्णा कलावटे यांनी हे बीटल पुणे जिल्ह्यातील मोरगाव येथील मोरेश्वर मंदिर परिसरात शोधले आहे. न्यूझीलंड येथील पीअर रिव्ह्यू केलेल्या आंतरराष्ट्रीय जर्नल झटेक्सामध्ये नुकतेच प्रकाशित झाले आहे. हे लहान प्राणी मृत जीवांचे शव खाऊन पर्यावरणाची स्वच्छता करून मानवजातीला मदत करत आहेत. मृत शरीरावर त्यांची उपस्थिती फॉरेसिन्सक शास्त्रज्ञांना जीवाच्या मृत्यूची गणना करण्यासाठी उपयुक्त ठरु शकते. ॲफ्रोमोरगूस या उपजातींत एकुण नऊ प्रगतीच्या समावेशासह भारतातील या उपजातीची विविधता दहावर आल्याची माहिती डॉ. अपर्णा कलावटे यांनी दिली. येरवडा : नवीन बीटल (कीटक) फॉरेन्सिक सायन्ससाठी महत्वाचे आहे कारण ते प्राणी किंवा मानवाच्या मृत्यूची वेळ शोधण्यात मदत करू शकतात. नव्याने सापडलेल्या बीटलला ओमोर्गस (ॲफ्रोमोर्गस) मोरेश्वर कलावटे आणि स्ट्रम्फर, २०२४, असे नाव देण्यात आले आहे. कारण ते अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या मोरगाव (पुणे जिल्हा, महाराष्ट्र राज्य, भारत) या गावात असलेल्या मोरेश्वर मंदिराजवळ गोळा करण्यात आले होते. ट्रोगिडे कुटुंबातील बीटल नेक्रोफॅगस असतात आणि म्हणून त्यांना केराटिन बीटल देखील म्हणतात. नव्याने सापडलेला बीटल ट्रोगिडे कुटुंबातील आहे. एखाद्या जीवाच्या मृत्यूनंतर, शरीराच्या विघटनादरम्यान, ब्लोफ्लाइज हे पहिल्या टप्प्यात येतात आणि त्यानंतर विविध शिकारी (predatory beetles) बीटल येतात जे मोठ्या संख्येने अळया खातात. जेव्हा बहुतेक मऊ ऊतींचे सेवन केले जाते, तेव्हा इतर विविध कीटक येतात जे उर्वरित त्वचा, केस, कूर्चा आणि हाडे खातात. केराटीन फीडर्सच्या आगमनाने अंतिम क्रमवारीचा टप्पा गाठला जातो. मुख्यतः डर्मेस्टिडे कुटुंबातील बीटल (लप आणि त्वचा बीटल) आणि ट्रोगिडे (केराटिन बीटल) जरी ते सामान्यत: उत्तराधिकाराच्या क्रमाने शेवटचे आले असले तरी ते जळलेल्या मृतदेहांवर (on burned and charred bodies) एकापाठोपाठ पहिले असू शकतात. जळालेली त्वचा ट्रोगिड्सने खाल्ल्यानंतर, (आता उघड झालेल्या ताज्या पृष्ठभागांसह) इतर न्यायवैद्यकदृष्ट्या महत्त्वाच्या कीटकांद्वारे व्यवहार्य वसाहत करण्यास अनुमती देते जे अचूक पोस्टमार्टम अंतराल अंदाज निश्चित करण्यात मदत करतात. या मोरेश्वर केराटीन बीटलचा शोध भारतीय शास्त्रज्ञ डॉ. अपर्णा सुरेशचंद्र कलावटे यांनी लावला आहे. त्या भारतीय प्राणी सर्वेक्षण, पश्चिमी प्रादेशिक केंद्र, पुणे येथे कार्यरत आहेत. प्रिटोरिया, दक्षिण आफ्रिका येथील डिट्सॉन्ग नॅशनल म्युझियम ऑफ नॅचरल हिस्ट्रीचे संचालक वर्नर पी स्ट्रम्फर यांनी या पेपरचे सहलेखन केले होते. नवीन प्रजाती ट्रोगिडे कुळातील आहे. ॲफ्रोमोरगूस या उपजातींत एकूण नऊ प्रजाती आहेत आणि आता या नवीन प्रजातीच्या समावेशासह भारतातील या उपजातीची विविधता दहा वर आली आहे. त्याच पेपरमध्ये काही वर्गीकरणात्मक बदलांसह ओरिएंटल आणि पॅलाएर्क्टिक प्रदेशांतून ओळखल्या जाणाऱ्या उपजिनस ॲफ्रोमोर्गसच्या त्यांच्या उपलब्ध समानार्थी शब्दांसह सर्व २२ वैध प्रजातींचे सचित्र कॅटलॉग दिले आहेत. जे नवोदित संशोधक या गटामध्ये संशोधनाचा अभ्यास करू इच्छितात त्यांना हे कॅटलॉग उपयोगी पडेल असे डॉ. अपर्णा म्हणाल्या. या गटातील बीटलांना काहीवेळा हाईड बीटल म्हणतात कारण ते त्यांचे शरीर मातीखाली झाकून लपवतात. ते फोटोजेनिक नाहीत व ते सहसा काळे किंवा राखाडी असतात आणि मातीत भरलेले असतात. केराटिन बीटलचा सामान्यतः ओरिएंटल प्रदेशात आणि विशेषतः भारतामध्ये जगाच्या इतर भागाच्या तुलनेत कमी अभ्यास झालेला आहे असं डॉ. अपर्णा म्हणाल्या. ट्रॉगिड बीटलवर काम करणाऱ्या त्या पहिल्या भारतीय शास्त्रज्ञ आहेत आणि त्यांनी दोन नवीन प्रजातींचे वर्णन केले आहे. आजपर्यंत, केवळ परदेशी शास्त्रज्ञच भारतीय ट्रॉजीड जीवजंतूंचे वर्णन करत होते. हे लहान प्राणी मृत जीवांचे शव खाऊन पर्यावरणाची स्वच्छता करण्यात मानवजातीला मदत करत आहेत. तसेच, मृत शरीरावर त्यांची उपस्थिती फॉरेन्सिक शास्त्रज्ञांना जीवाच्या मृत्यूची गणना करण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. या चिमुकल्या बीटलच्या संवर्धनासाठी आपण सर्वसामान्यांना त्याचे महत्त्व आणि स्वरूप याविषयी जागरूक करणे आवश्यक आहे. भारतातील या कमी अभ्यासलेल्या गटातील अधिक प्रजातींचे दस्तऐवजीकरण करणे हे उद्दिष्ट आहे कारण आपला देश जैवविविधतेने समृद्ध आहे आणि अजून अनेक प्रजातींचा शोध घेणे व त्यांचे वर्णन करणे बाकी आहे असे डॉ. अपर्णा यांनी सांगितले.





# स्किझोफ्रेनिया होण्याची कारणे व उपचार

### स्किझोफ्रेनिया

स्किझोफ्रेनिया ह्या आजाराबाबत आपण ऐकत असतो पण सविस्तर माहिती नसते म्हणूनच लोकांना या आजाराबाबत माहिती मिळावी व तसेच ह्या आजाराबाबत उपचार लवकर सुरु केल्यास हा आजार आटोक्यातही येऊ शकतो .



स्किझोफ्रेनिया या आजाराबाबत सोप्या भाषेत माहिती देण्याचा हा एक माझा प्रयत्न ....

### स्किझोफ्रेनिया म्हणजे काय ?

स्किझोफ्रेनिया यालाच मराठी मध्ये छिन्नमनस्कता असे म्हटले जाते किंवा दुभंगलेले मन अशी हि स्किझोफ्रेनिया ची ओळख आहे.हा एक गंभीर मानसिक आजार आहे. भास व भ्रम तसेच मनाचा विचारांचा गोंधळ होणे व वर्तनांत बदल होणे हे या विकृतीचे मुख्य लक्षण आहेत .या आजाराची सुरुवात युवा अवस्थेत होऊ शकते.लवकर उपचार घेतले तर नक्कीच हा आजार आटोक्यात राहू शकतो.रुग्ण हा सर्वसामान्य लोकांप्रमाणे आपले जीवन व्यतीत करू शकतो. स्किझोफ्रेनिया आजाराला असे नाव का पडले तर संशोधक सांगतात कि ग्रीक भाषेमध्ये स्कीझीन म्हणजे दुभंगलेले मन आणि फ्रेन म्हणजे मन असा ह्या आजाराच्या दोन शब्दावरून स्किझोफ्रेनिया असे नाव पडले . स्किझोफ्रेनिया हा शब्द प्रथम युजेन ब्ल्यूलर या प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ यांनी प्रथम वापरला म्हणून यांना स्किझोफ्रेनिया या आजाराचे जनक म्हणतात .

### स्किझोफ्रेनिया होण्याची कारणे कोणती ?

मानसोपचारतज्ज्ञ यांच्या मते ह्या आजार होण्याची कारणे असंख्य आहेत. अनुवंशिकता, मेंदूमध्ये होणारे रासायनिक बदल,कौटुंबिक समस्या,स्पर्धात्मक आयुष्य,व्यसनांमुळे इत्यादी अनेक कारणे आहेत जि स्किझोफ्रेनिया या आजाराला कारणीभूत आहेत.

### स्किझोफ्रेनिया या आजाराची लक्षणे कोणती ?

या विकृतीमध्ये पुढीलप्रमाणे प्रमुख लक्षणे आढळतात ....

1) भ्रम होणे

2) भास होणे

3) विचार करतना अडथळा निर्माण होणे

4) प्रेरणेची कमतरता

5) आपल्या भावनांना नित व्यक्त न करता येणे

6) समाजापासून लोकांपासून दूर राहणे

7) संशय घेणे

8) पुटपुटने

9) सतत बडबड काणे , असंबद्ध बडबड करणे.

10 ) हसत राहणे

11 ) अस्वछ राहणे ,आंघोळ न करणे

इत्यादी महत्वाची व माहित असलेली लक्षणे दिसून येतात ..

### स्किझोफ्रेनिया या आजारावर उपचार कसे करतात ?

स्किझोफ्रेनिया या आजाराला जितक्या लवकर ओळखता येईल तितक्या लवकर रुग्ण बरे होतात. त्यासाठी औषधोपचार सुरु करणे गरजेचे असते. अश्या रुग्णांना पुढील प्रमाणे उपचार केले जातात. आजारची तीव्रता पाहून डॉक्टर रुग्णांस बाह्यरुग्ण विभाग किंवा रुग्णालयात दाखल करून उपचार देतात ..

1) औषधोपचार

2) ECT / विद्युत झटका देणे

3) सायकोथेरपी

4) समुपदेशन

5) कौशल्य प्रशिक्षण

याच बरोबर रुग्ण व नातेवाईक यांनी इच्छाशक्ती असणे जरुरी आहे. वेळोवेळी उपचारास हजर राहणे हि तितकेच महत्वाचे आहे.दररोज रुग्णांना औषधे देणे गरजेचे आहे. त्याचबरोबर प्राणायम ,योगा ,शारीरक व्यायाम,छोटी छोटी कामे देणे तसेच रुग्णांनी आपले छंद जोपासणे हि महत्वाचे आहे .

कोणत्याही आजाराला उपचार हे असतातच ... आणि ह्यासाठी दृढनिश्चय हि तितकाच महत्वाचा असतो.सरकारी रूग्णालय ,खाजगी रुग्णालय,पुनर्वसन केंद्र येथे स्किझोफ्रेनिया या आजारावर उपचार घेऊ शकतात.आपल्या वागण्यात विचारात बदल जाणवल्यास त्वरित आपल्या नातेवाईक ,मित्रपरिवार यांना जरूर सांगावे किंवा नातेवाईक –मित्रपरिवार यांना जर बदल जाणवल्यास त्वरित उपचार सुरु करावेत.

जाता जाता अतुल कुलकर्णी यांनी अभिनय केलेल्या देवराई या सिनेमातील कवितेच्या चार ओळी खास अश्या रुग्णांना व नातेवाईक यांना समर्पित...

**नाही हाकारा, पण उठले रान**
**घरटे सापडेना वाट**
**बेभान पाखरू, समजेना कोणा**
**का कल्लोळ कल्लोळ .....**

> कोणतीही गोष्ट शिके पर्यंत अनंत अडचणी, समस्या येत असतात! ज्या अनिवार्य असतात! असं म्हणतात "समस्या नाही असा मनुष्य नाही, आणि समस्येचे समाधान नाही, अशी समस्या नाही" म्हणजे काय तर प्रत्येक समस्येला उत्तर असतं! ते उत्तर वा उत्तरे शोधण्याची इच्छाशक्ती आपल्या मध्ये किती आहे, त्यावर ती समस्या कधी सुटणार, कशी सुटणार हे अवलंबून असते.

# कार ड्रायव्हिंग एक आनंद सहल!



## कारनामा !



**श्रीकांत वाघ**

आता हेच पाहा, कार ड्रायव्हिंग शिकणं हे खूप जणांचं स्वप्न असतं! पण मनात भीती खूप असते! कार ड्रायव्हिंग स्कूल लावून सुद्धा काही जणांना कार ड्रायव्हिंग येत नाही! शेजारी बसणारा इन्स्ट्रक्टरच क्लच ब्रेक ऑपरेट करत असल्यामुळे ही समस्या बहुतेकांना येते!

अशा लोकांना गेल्या आठ वर्षांपासून मी त्यांच्या कारवर, त्यांच्या घरी जाऊन, कार शास्त्रोक्त पद्धतीने शिकवतो. त्यामुळे आता ते अगदी बिनधास्त आणि बिनदिक्कतपणे कार ड्रायव्हिंग करतात! कार ड्रायव्हिंगचा आनंदही उपभोगतात!

माझी एक स्टुडंट होती डॉक्टर रुजुता देशपांडे, ती पिझीओथेरपिस्ट आहे. तिचे बेसिक ट्रेनिंग झाल्यावर आम्ही long drive ला गेलो. शनिवार पेठ ते रावेत, रावेतचा संत तुकाराम पूल, हे डेस्टिनेशन होते. तिथे पोहचे पर्यंत तिच्याकडून अनेकदा गाडी बंद पडली. पण ती गाडी मात्र चांगली चालवत होती, आणि चक्क तिसऱ्या आणि चौथ्या गिअर वरही चालवत होती, अगदी चाळीस पन्नासच्या स्पीडने, त्यामुळे तिला कार ड्रायव्हिंगची मजाही येत होती.

तिला मी विचारले "आज long drive करताना कसं वाटतं आहे? आत्मविश्वास वाढला की नाही?"

त्यावर ती म्हणाली " सर माझ्याकडून काही वेळा गाडी बंद पडली पण आता मी चक्क चौथ्या गिअर वर गाडी चालवत आहे आणि मजाही खूप येत आहे, त्यामुळे पहिल्या दिवशी जी भीती वाटत होती की आपल्याला गाडी जमेल की नाही? पण आता गाडी जमतेही आहे आणि नुसती जमत नाही तर मजाही येत आहे. आणि पुणे शहरापासून दूर आल्यावर, जणू सहलीचा आनंदही मिळतो आहे. मी तर माझ्या सर्व मैत्रिणींनाही आवर्जून सांगेन की, कार ड्रायव्हिंग नक्की शिका! स्वतः कार ड्रायव्हिंग करत शहरापासून दूर दूर कुठेतरी फिरायला जाणे यात काय मज्जा येते, ते मी किंवा कोणी सांगून नाही कळणार! त्यासाठी स्वतः कार ड्रायव्हिंग करणं आवश्यक आहे "

ऋषी कपूर, नितू सिंह, राकेश रोशन यांचा एक खूप सुंदर सिनेमा होता, "खेल खेल में " नावाचा. रोमॅण्टिक आणि सस्पेन्स थ्रिलर असा तो चित्रपट! त्या मध्ये राकेश रोशनची मैत्रीण दाखवली आहे अरूणा इराणी! एकदा राकेश रोशन तिला भेटायला जाताना एक भली मोठी कार, इम्पाला कार घेऊन जातो आणि म्हणतो"डार्लिंग ये तुम्हारे लिये हैं!"

अरूणाइराणी खूपच खुश होते.

"सपना मेरा बित, वो ना रहा, कुछ ना रहा"

या गाण्यात ती राकेश रोशन बरोबरच्या कार मधील आठवणी एकेका कडव्यातून व्यक्त करत असते.

राकेश रोशन अगदी जोरात कार ड्रायव्हिंग करत असतो , तेंव्हा ती म्हणते, राजा गाडी तो हवा से बाते कर रही है!"

आणि ते अगदी मजेत, प्रेमाने Long drive ची मजा लुटत असतात.

तर सांगायचा मुद्दा असा की कार ड्रायव्हिंग आपण जोवर स्वतः शिकत नाही, करत नाही, तो पर्यंत आपल्याला ड्रायव्हिंगची मजा घेता येणार नाही.

मी अगदी अलीकडेच म्हणजे मागच्या रविवारीच एका फूड इंडस्ट्रीतील प्रोफेसर असणाऱ्या इशा फाटक यांना कार ड्रायव्हिंग शिकवत असताना म्हटले की खाणं बनविताना ज्या प्रकारे हळद मिठाचा योग्य प्रमाणात वापर करतो, त्याच प्रमाणे कार ड्रायव्हिंग मध्ये क्लच ब्रेक इत्यादी गोष्टींचा वापर करावा लागतो. कोणतीही गोष्ट शिकताना त्या त्या गोष्टीचे एक गणित असते, शास्त्र असते. ते प्रथम प्रथम आपल्याला अवघड जटील वाटते, पण एकदा या अवघड गणितीय पायऱ्या पार केल्या की मग तिथून पुढे खरी कला, कलाकारी, करामत, करमणूक आणि सहल सुरू होते, त्या त्या गोष्टीतूनही प्रचंड आनंद मिळवता येऊ शकतो!

म्हणून मला वाटते, कार ड्रायव्हिंग उत्तमरित्या शिकल्यानंतर, Long drive ची आणि सहलीचा आनंद, सहलीची खरी मजा आपण आत्मनिर्भरपणे उपभोगू शकू, नाही का?

दैनिक ‘महा मेट्रो’ प्रकाशक, मालक, संपादक दिलीप कुऱ्हाडे यांनी श्री समर्थ एंटरप्रायजेस, शॉप न. १, बेसमेंट, वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (महाराष्ट्र) येथे छापून फ्लॅट नं.९, फ्रेंडन्स पॅराडाईज सोसायटी, शिरोळे रोड, संभाजी बागेच्या समोर, शिवाजीनगर, पुणे–४११००४ येथे प्रकाशित केले. दूरध्वनी क्रमांक २०–४००४६६०९, मोबाईल : ९९२२९३०१९५, Email-mahametronews.pune@gmail.com या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामध्ये व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
TC. MAHMAR51691 NO.SDM/PUNE/SR/56/2022 MAHA METRO RNI N0.MAHMAR2022/87390, This Daily Owner, Publisher, Editor, is Mr. Dilip Kisan Kurhade Printed at Shree Samarth Printers, Shop No.1, Besment, Vartak Apartment, 499, Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Flat No. 9, Friends Paradies Society, Shirole Road, Opp. Sambhaji Park, Shivaji Nagar, Pune - 411004.



# मनोरुग्णालयात पदव्युत्तर मानसोपचार अभ्यासक्रम

येरवडा प्रादेशिक मनोरूग्णालयात पदव्युत्तर मानसोपचार, परिचारिका चिकित्सालयातीन मानसशास्त्र हा अभ्यासक्रम सुरू झाला आहे. तर पदव्युत्तर मानसोपचार व मानसशास्त्रीय समाजसेवक हे प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुढील शैक्षणिक वर्षांपासुन सुरू होणार आहेत. दिवसेंदिवस मानसिक आजाराचे रुग्ण वाढत आहेत. अशा अभ्यासक्रमांमुळे याक्षेत्रातील मनुष्यबळांची गरज भागणार आहे.

येरवडा मनोरूग्णालयातील रुग्ण संख्या २५४० असून सध्या याठिकाणी नऊशे पुरूष व सहाशे महिला रुग्ण उपचार घेत आहेत. नवीन अभ्यासक्रमाची आवश्यकते संदर्भात डॉ. पाटील म्हणाले, ‘‘ रुग्णालयातील रुग्णसंख्या पाहता याठिकाणी पदव्युत्तर मानसोपचाराचा अभ्यासक्रम सुरू करण्याचा विचार आरोग्यविभागाने घेतला होता. मानसिक आजारांच्या रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेऊन आरोग्य विभागाने केंद्राकडे पदविका व प्रमापणत्र अभ्यासक्रम सुरू करण्याची परवानगी मागितली होती. केंद्र सरकारने तीन विषयांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्याची परवानगी दिली आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाने तयार केलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाला मान्यता मिळाली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत असलेल्या कर्वे सामाजिक संस्थेच्या वतीने मानसशास्त्रीय समाजसेवक, परिचारिका चिकित्सालय मानसशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम पहिल्या टप्प्यात सुरू करण्यात येणार आहे. त्यापैकी परिचारिका चिकित्सालय हा अभ्यासक्रम गेल्या वर्षी सुरू करण्यात आले आहे. राज्य आणि केंद्राच्या मेडिकल कॉन्सिलची पाहणी झाल्यानंतर पदव्युत्तर मानसोपचार अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे.

मनोरूग्णालयात रुग्णाला दाखल केल्यानंतर रुग्णांची मानसिक व शारिरीक चाचणी केली जाते. येथे रुग्णाला शॉक ट्रिटमेंट दिले जाते. त्यापूर्व रुग्णाची रक्त तपासणी,एक्सरे, ईसीजी आदी वैद्यकीय तपासण्या केल्या जातात. त्यानंतरच भुल देऊन शॉक ट्रिटमेंटचा उपचार सुरू करतात. या ठिकाणी प्रत्येकी एक इलेक्ट्रोथेरपीस्ट, भूलतज्ज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ आणि वैद्यकीय अधिकारी आहेत. रुग्णांचा आजार किती दिर्घ आहे, त्यांची शारीरिक व मानसिक स्थितीवरून त्यांना फिट, अशक्त किंवा सर्वसाधारण कक्षात उपचारासाठी ठेवले जाते. त्यामुळे याठिकाणी मानसोपचार अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी अधिक सोईचे व फायद्याचे ठरणार आहे.

# 'बार्टी' एक समता प्रस्थापित करणारी सामाजिक चळवळ!

महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अनेक चळवळी उदयास आल्या .काही काळापुरत्या, काही क्षणिक, तर काही दीर्घकाल टिकून राहणाऱ्या. पण बार्टी, अर्थात डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ही संस्था नव्हे तर ती एक समता प्रस्थापनेसाठी जणू चळवळ म्हणून काम गेल्या ४७ वर्षापासून अनुसूचित जातींसाठी काम करीत आहे आहे. ही संस्था केवळ एका विषयापुरती मर्यादित नाही; तर शिक्षण, प्रशिक्षण,संशोधन,लेखन, मूल्यमापन, सामाजिक न्याय, समता आणि सांस्कृतिक पुनरुज्जीवन यांचा संगम आहे. त्यामुळेच "बार्टी" ही संस्था नसून एका विचारसरणीची सतत चालती-बोलती मोहीम आहे.

बार्टीच्या स्थापनेमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा भक्कम पाया आहे. महाराष्ट्र शासनाने सामाजिक समता या विषयावर सखोल अभ्यास,संशोधन व प्रशिक्षणाचे कार्य व्हावे या उद्देशाने या संस्थेची १९७९ मध्ये मुंबईमध्ये स्थापना केली. पुढे ही संस्था १९८७ मध्ये पुण्यात स्थलांतरित झाली.या संस्थेच्या दैनंदिन कामकाजामध्ये स्वायत्तता यावी व संस्थेचे काम अधिक जलदगतीने व्हावे यासाठी महाराष्ट्र शासनाने सन २००८ मध्ये या संस्थेला 'यशदा' या प्रशिक्षण संस्थेसारखा स्वायत्तेचा दर्जा दिला. बार्टीच्या धर्तीवर आज विविध समाजाच्या उत्कर्षासाठी अनेक संस्था उदयाला आलेल्या आहेत. त्यामध्ये सारथी, महाज्योती आर्टी या संस्थांचा समावेश आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेचे नियामक मंडळ स्थापन करण्यात आले असून त्यांच्या नियंत्रणाखाली संस्थेचे कामकाज सुरू आहे.

त्याचबरोबर या नियमाक मंडळामध्ये विविध खात्यातील सुमारे १० वरिष्ठ सनदी अधिकारी यांचा समावेश आहे.संस्थेने ४७ वर्षात अनेक महत्त्वपूर्ण काम केली आहेत. अलीकडे संस्थेचा व्यापक विस्तार झाला असून संस्थेची ध्येय, उद्दिष्ट याप्रमाणे विविध सामाजिक समतेशी निगडित संशोधन प्रकल्प,वंचित घटकासाठी काम करणारे अधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांना प्रशिक्षण, सामाजिक न्याय विभागातील अधिकारी-कर्मचारी यांची प्रशिक्षणाद्वारे क्षमतावृद्धी, सामाजिक न्याय विभागाच्या योजनांचे मूल्यमापन, विविध स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व आर्थिक सहाय्य,उद्योजकता निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम, अॅट्रॉसिटी अॅक्ट कायद्याची जाणीव जागृती, त्याचबरोबर महापुरुषांच्या कार्याचा जागर व्हावा यासाठी अनेक कार्यक्रम, उत्सव या संस्थेच्या माध्यमातून होतात. समाजातील वंचित, पीडीत, उपेक्षित माणसाला आत्मसन्मान मिळवून देण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. त्यांचाच विचार पुढे नेण्याचे काम ही संस्था करत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संबंधित महाड येथील चवदार तळे येथील स्मारक, येवला येथील प्रेरणाभूमी, स्मारक याची देखभाल व दुरुस्ती तसेच भीमा कोरेगाव विजयस्तंभ येथे होणाऱ्या कार्यक्रमाचे समन्वय व तसेच येथे अनेक समाजउपयोगी कार्यक्रम राबविण्याची जबाबदारीही या संस्थेकडे आहे.

वंचित, मागास, आणि आर्थिक स्थितीने दुर्बल असलेल्या तरुणांना केवळ स्वप्ने दाखवणे नाही, तर



त्यांच्या स्वप्नांना बळ देणे व त्यांना स्वप्नांच्या दिशेने नेणे, त्याची वाट दाखवणे हे काम 'बार्टी' सातत्याने करते. बार्टीचा स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोठा प्रकल्प आहे तो राजधानी दिल्ली सह राज्यभर विस्तारला आहे. बार्टीने स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण सुरू केले, तेव्हा हा उपक्रम फार मोठा आणि धाडसी होता. यूपीएससी एमपीएससी सारख्या परीक्षांसाठी लाखो रुपये खर्च होतात, कोचिंगची सुविधा सहज सर्वसामान्य गरीब विद्यार्थ्यांसाठी मिळत नाही. पण बार्टीने हे सर्व मोफत उपलब्ध करून दिले. योग्य मार्गदर्शन, अभ्यास साहित्य, तज्ज्ञ प्राध्यापक, निवासी प्रशिक्षण व शिस्तबद्ध वातावरण यामुळे महाराष्ट्रातील हजारो तरुणांनी प्रशासकीय सेवेत प्रवेश केला. एखाद्या तरुणाचे आयुष्य बदलणे म्हणजे त्याच्या कुटुंबाच्या आणि पुढच्या पिढ्यांच्या भविष्यामध्ये प्रकाश पेरणे होय. अशी हजारो घरात प्रकाश पेरण्याचे व त्या घरांना उजळवण्याचे काम 'बार्टीने 'केले आहे. हीच सामाजिक जागृती आणि सक्षमीकरणाची खरी चळवळ आहे. त्यात बार्टी झोकुन देऊन काम करत आहे. सामाजिक संशोधन हे बार्टीचे दुसरे मजबूत अंग आहे. विविध जाती,समाजांची शैक्षणिक स्थिती, आर्थिक प्रगती, रोजगार, आरक्षणाची अंमलबजावणी, सामाजिक विषमता, ग्रामीण-शहरी तफावत, तरुणांचे कौशल्य या आणि अशा अनेक विषयांवर बार्टीने संशोधनात्मक अभ्यास केला. धोरणनिर्मिती करणाऱ्यांना दिशा देणे, समाजातील समस्या वैज्ञानिक पद्धतीने ओळखणे आणि त्यावर उपाय सूचवणे ही परिवर्तनाची बौद्धिक बाजू आहे. त्यामुळे बार्टी आपल्या संशोधन विभागामार्फत अनेक संशोधन प्रकल्प राबवून हे काम करीत आहे.

> डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था अर्थात 'बार्टी' या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या स्वायत्त प्रशिक्षण व संशोधन संस्थेचा २२ डिसेंबर हा ४७ वा वर्धापन दिन. या वर्धापन दिनानिमित्त संस्थेच्या कार्यावर टाकलेला प्रकाश

आर्थिक सबलीकरण हा सामाजिक समतेचा मुख्य पाया आहे. फक्त नोकरीच्या संधी वाढविल्या जाऊन समाज बदलत नाही; तर तरुणांनी स्वयंरोजगार, व्यवसाय आणि उद्योजकतेच्या क्षेत्रातही उतरले पाहिजे. त्यासाठी बार्टीने अनेक उद्योजकता विकास कार्यक्रम राबवले, तरुणांना वित्तीय ज्ञान दिले, स्टार्टअप सुरू करण्याचे कौशल्य शिकवले आणि उद्योग उभारण्यासाठी आवश्यक मानसिकता निर्माण केली. आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे म्हणजे सामाजिक साखळ्या तुटणे आणि स्वतःचे भविष्य स्वतः घडवणे. ही प्रक्रिया वेगाने वाढत आहे आणि बार्टीची ही चळवळ गावोगावी पोहोचत आहे. तरुणांना उद्योगाकडे वळविण्यासाठीही बार्टीचा मोठा सहभाग आहे.आज कौशल्य विकास विभागामार्फत असे अनेक कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी सुरू आहेत. त्याचबरोबर विविध व्यावसायिक अभ्यासक्रमासाठीही संस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण, शिष्यवृत्ती दिली जाते त्यामध्ये वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी जेईई, नीट, अभियांत्रिकी, न्यायालयीन सेवा, स्टाफ सिलेक्शन, लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचा समावेश आहे. दरवर्षी संस्थेमार्फत हजारो विद्यार्थ्यांना याचा फायदा होतो. त्याचबरोबर मुख्य परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांना मुलाखतीला तोंड देण्यासाठी आर्थिक सहाय्य ही संस्था करते. त्याचबरोबर शिव , शाहू- फुले- आंबेडकरी, अण्णाभाऊ साठे साहित्य निर्मितीसाठी तसेच हे साहित्य अत्यंत अल्प किमतीमध्ये सर्वदूर सर्वसामान्य लोकांपर्यंत कसे पोहोचेल, यासाठी बार्टीचा विस्तार व सेवा तसेच प्रकाशन प्रसिद्धी विभाग प्रयत्नरत आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधान आणि ज्या संविधानामुळे संबंध देश एकसंध आहे त्या संविधानाचा प्रचार- प्रसार देशात जर सर्वाधिक कोणी केला असेल तर तो बार्टी या संस्थेने. या संस्थेने आतापर्यंत लाखो संविधानाच्या प्रति अत्यंत कमी दरात लोकांपर्यंत पोहोचविल्या आहेत. यासाठी स्वतंत्र भांडार निर्माण केले आहे. शिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्य इतर भाषेत भाषांतरित करून इतर राज्यांपर्यंत बाबासाहेबांचा विचार अधिक जोमाने पोहोचवण्याचे काम सुद्धा ही संस्था करत आहे. संविधानिक मूल्यांचा प्रसार तसेच समाजातील अज्ञान, अंधकार, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा नष्ट करण्याचे कामही संस्थेचे सुमारे ३०० समतादूत करीत आहेत तसेच शासनाच्या विविध योजनांचा प्रचार- प्रसार करण्याचे कामही राज्यभर हे समतादूत रोज करतात.

व्याख्याने प्रबोधनाचे कार्यक्रम, प्रकाशने, ग्रंथालय सेवा, सांस्कृतिक कार्यक्रम, संशोधनपर ग्रंथ, डॉ. आंबेडकरांच्या विविध पैलूंचा तसेच छत्रपती शिवाजी महाराज, छ.शाहू महाराज, महात्मा जोतिराव फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्याचे काम संस्था सातत्याने करते. अशा कार्यक्रमांमुळे नव्या पिढीत सामाजिकता, बौद्धिकता वाढत आहे.यातून समाजाचे विचारविश्व बदलले तरच समाज बदलतो या तत्त्वावर बार्टी उभी आहे.

आजची बार्टी डिजिटल पिढीसाठी नवे आयाम उघडत आहे. ऑनलाईन कोर्सेस, डिजिटल प्रशिक्षण मॉड्यूल्स, व्हर्च्युअल क्लास, वंचित विद्यार्थ्यांसाठी इंटरनेट-आधारित संधी निर्माण करणे हे सर्व आधुनिक उपक्रम सामाजिक परिवर्तनाची, नव्या युगाची आहेत . पूर्वी गावात कोणी 'आयएएस'अधिकारी पाहिला नसेल; पण आता त्या गावातीलच एखादा मुलगा किंवा मुलगी आयएएस'अधिकारी होऊन परत जाते आणि समाजातील इतर मुलांसाठी प्रेरणा ठरते. हे परिवर्तन सहज घडत नाही; त्यासाठी काही संस्था, माणसं काम करत असतात. यामध्ये बार्टी अग्रेसर आहे. बार्टीच्या माध्यमातून अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना थेट दिल्लीमधील नामवंत क्लासेसमध्ये मोफत प्रशिक्षण दिले जाते या संस्थांच्या माध्यमातून अनेक जण केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन आयएएस' आयपीएस, सनदी अधिकारी झाले आहेत. यात बार्टीची मोठी भूमिका आहे. संस्थेच्या माध्यमातून पीएचडीसाठी संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही फेलोशिपच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य दिले जाते, यामुळे अनेक जण उच्चविद्याविभूषित व पीएचडी धारक बनले आहेत. बार्टी अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी, त्यांच्या उत्थानासाठी संस्थेचे प्रेरणास्थान व सामाजिक न्याय खात्याचे मंत्री ना. संजय शिरसाठ, राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ, खात्याचे प्रधान सचिव मा.डॉ. हर्षदीप कांबळे व बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाने निरंतरपणे चौफेर वाटचाल करत आहे.

बार्टी ही संस्था सरकारी कार्यालय नसून समाजाचा मानबिंदू आहे. तिच्या उपक्रमांतून होणारा बदल केवळ व्यक्तीपुरता मर्यादित नाही, तर तो कुटुंब, समाज, प्रदेश आणि राज्याला स्पर्श करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, शिक्षणाची कास धरलेले भविष्य आणि समानतेवर आधारित सामाजिक बांधणी हे सर्व घटक या संस्थेनं पुढे नेले आहेत. बार्टी केवळ एका विषयावरच काम करत नाही तर अनेक विषय घेऊन बार्टी काम करत आहे. बार्टीने आपल्या कार्याच्या विविध कक्षा रुंदावल्या आहेत. संस्थेने अनेक समविचारी सरकारी संस्था, इतर राज्यातल्या संस्था यांच्याबरोबर सामंजस्य करारही केले आहेत. खरे तर संस्था आज विविध क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावत आहे, त्यामुळेच अनेक होतकरू व गरीब विद्यार्थ्यांचे संस्थेमुळे स्वप्न साकार झालीत,त्यामुळेच समता, शिक्षण, संशोधन, आर्थिक प्रगती आणि सामाजिक न्याय यांचा अखंडित प्रवाह बनली आहे. महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाचा हा आधुनिक अध्याय बार्टीशिवाय अपूर्णच राहील.

-डॉ. बबन जोगदंड ,विभागप्रमुख
विस्तार व सेवा ,बार्टी, पुणे, Mo. 9823338266

# अखेर हातभट्टी गाळणाऱ्यांवर कारवाई

## गावठी दारूच्या हातभट्ट्या फोडल्या

पुणे : येरवड्यातील पांडु लमाण वस्ती, नाईकनगर आणि कामगराजनगर, कंजारभाटनगरमध्ये गेल्या सहा दशकापासून हातभट्टी व्यवसाय सुरू आहे. पोलीस व उत्पादन शुल्क विभाग नावाला कारवाई करतो. येथील मद्यालये चोवीस तास खुली असतात. त्यामुळे दारू गाळणाऱ्या आणि विक्री करणाऱ्यांवर चाप कधी बसणार असा संतप्त सवाल नागरिकांना पडला आहे. मात्र निवडणूकीच्या पाश्वभूमीवर पांडूलमाणवस्ती व नाईकनगर येथील हातभट्टी पोलीसांनी उध्वस्त करून रसायन रस्त्यांवर ओतले.

येरवड्यातील पांडु लमाण वस्ती, नाईकनगर, कामगराजनगर, कंजारभाटनगरमध्ये आजही परंपरागत हातभट्ट्या लावून दारू गाळली जाते. गेल्या सहा दशकापासून ते हा व्यवसाय करतात. स्थानिक पोलिस, उत्पादनशुल्क विभाग त्यांच्यावर वारंवार कारवाई करतात. मात्र उपयोग होत नाही. येथे हातभट्टी गाळणे व दारू विक्री जोरात सुरू असते. रात्रभर येथील मद्यालये सुरू असतात. कंजारभाटनगरमध्ये देशी व विदेशी मद्य सर्रास विक्री होत असते. येथील हातभट्टी बंद होत नसल्यामुळे स्थानिक रहिवाशांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. या हातभट्ट्यांवर कारवाई कोणी करावी यासाठी उत्पादन शुल्क विभाग आणि पोलीसांमध्ये सतत वाद होत असतो. दोघेही कारवाई करू शकतात. मात्र ते करत नाहीत. केलीच तर ती नावालाच असते. त्यामुळे आजपर्यंत हे व्यवसाय बंद झाले नाहीत. उलट या व्यवसायात आधुनिकता आली आहे. एकेकाळी भट्टी पेटविण्यासाठी लाकडांचा त्यानंतर रॉकेल आता तर घरगुती गॅस इंधन म्हणून वापरले जाते. हातभट्टीसाठी लागणारे रसायन व गुळाची दुकाने त्यांच्या घरापर्यंत सेवा देतात. पाण्याचा मुबलक साठा असून अनेकांनी घराशेजारीच जमिनीखाली सिमेंट कॉंक्रिटच्या टाक्या बांधलेल्या आहेत. त्यामुळे कारवाई झालीच तर दोन ते तीन डबे, ड्रम फोडले जातात. विक्री करणाऱ्या महिलांवर गुन्हे दाखल केले जातात. गुन्हा गंभीर नसल्यामुळे त्यांना जामीन मिळतो. ते पुन्हा जोमाने हातभट्ट्या सुरू करतात. हे दृष्टचक्र अनेक दशके सुरूच आहे.

> **खुले आम देशी व विदेशी मद्य विक्री**
>
> ‘ पांडु लमाण वस्ती, नाईकनगर, कंजारभाटनगर मध्ये रात्रभर मद्यपींची गर्दी याकडे पूर्णतः पोलिसांची दुर्लक्ष असते . आता महापालिकेच्या निवडणुकीत देशी व विदेशी दारू विक्री जोरात होणार यात शंकाच नाही.यावर नवीन झालेल्या पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र कदम कारवाई करतील अशी आशा आहे.

# पुणे जिल्हा फौजदारी न्यायालय आठ मजली इमारतीत

२८ न्यायालय; १६१ कोटी रूपयांचा निधी
२०१७ मध्ये जागा ताब्यात; प्रत्यक्ष कामाला २०२५ मध्ये सुरवात

पुणे : विमानतळ रस्त्यावरील स.न.१९१, बंगला क्रमांक चार येथील आठ हजार चौरस मीटरमध्ये पुणे जिल्हा फौजदारी न्यायालयाची बहुमजली इमारत होत आहे. यामध्ये दोन तळमजली वाहनतळ असून आठ मजली इमारतीत २८ न्यायालय असणार आहेत.

सध्या शिवाजीनगर येथील जिल्हा न्यायालयात फौजदारी खटले चालविले जातात. जिल्हा न्यायालयाच्या इमारतींना लवकरच शंभर वर्ष पूर्ण होणार आहेत. त्यामुळे नवीन फौजदारी न्यायालयासाठी जागेची चाचपणी सुरू होती. येरवड्यातील स.न. १९१ बंगला क्रमांक चार येथील सुमारे आठ हजार चौरस मिटर जागा न्यायालयाला मिळाली आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने नवीन न्यायालयाच्या इमारतीचा प्रस्ताव तयार केला होता. त्यात काही त्रुटी आढळल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने १६१ कोटी रूपये खर्च अपेक्षित असलेल्या इमारतीचे आराखडा तयार केला आहे. यामध्ये दोन तळमजली वाहनतळ, आठ मजली इमारतीत २८ न्यायालय असणार आहेत. यामध्ये केवळ फौजदारी खटले चालविले जाणार आहेत. तर शिवाजीनगर येथील न्यायालयात दिवाणी स्वरूपाचे खटले चालविले जाणार आहेत. येरवडा मध्यवर्ती कारागृहात दरवर्षी विविध गुन्ह्यातील बारा ते पंधरा हजार आरोपी दाखल होत असतात. यातील सत्तर टक्के कच्चे कैदी असतात. या सर्वांचे खटले फौजदारी न्यायालयात चालतात. त्यामुळे आरोपींना न्यायालयात हजर करणे, त्यानंतर कारागृहात घेऊन जाणे हे अवघड असते. त्यामुळे येरवडा कारागृहाच्या अवध्या दीडशे ते दोनशे मिटर अंतरावर न्यायालय होणे हे पोलिस, न्यायालय आणि कारागृहाच्या सोईचे तर आहे. यासह वेळेची, पैशाची बचत होणार आहे .

### सर्वसामान्यांना न्याय मिळविण्यासाठी संघर्ष करता येऊ नये

‘रूल ऑफ लॉ ‘ प्रमाणे न्याय मिळवून देण्याची जबाबदारी न्यायालयांची आहे. त्यामुळे न्यायालयांची संख्या अधिक असेल तर सामान्यांना अधिक लवकर न्याय मिळणार असल्याची माहिती सर्वोच्च न्यायालयाचे मुख्यन्यायमुर्ती अभय ओक यांनी नुकतेच येरवड्यातील पुणे जिल्हा फौजदारी न्यायालयाच्या भूमीपुजन समारंभात बोलत होते.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती प्रसन्न वराळे म्हणाले, “न्यायालयाकडे गाऱ्हाणे घेऊ येतो अशांनी जलद न्याय दिले पाहिजे. संविधान दस्ताऐवज म्हणून न वापरता त्यांचे तत्व म्हणून वापरले पाहिजे. मनातील किल्मिषे जाळली पाहिजे.दलित गरीब यांचे उन्नयन होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.” अन्नसुरक्षा कायदा आहे. अन्न, खाद्यान्य तपासणी यंत्रणा, आहे. त्यासाठी अधिकारी निवडले आहेत. अन्नसुरक्षा कायद्यात अन्न व खाद्य पदार्थात मूलभूत घटक काय असावे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार त्यांना आहेत. अशा वेळी प्रत्यक्षपणे नाव न घेता खाटीक व बोकड व बकरीचे हलाल करणा-या मध्ये वाद निर्माण करणे अमूक एकाकडून मटण प्रमाणित करून घ्या म्हणणे म्हणजे घटनेची पायमल्ली होत आहे.महाराष्ट्र पुरोगामी , प्रागतिक, पुरोगामी चेहरा म्हणून पुसून टाकणार का असा प्रश्न न्यायमूर्ती वराळे यांनी विचारला.

सर्वोच्च न्यायालयाचे मुख्यन्यायमूर्ती अभय ओक म्हणाले, “ ५१ कलम प्रमाणे घटनेच्या तरतुदी पालन करणे ,आदर करणे पर्यावरण आदर व संवर्धन करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

घटनेचे अधिक्षप करीत असेल तर त्यांनी स्पष्ट सांगणे आवश्यक आहे. बांधकामासाठी वृक्ष काढले जात असतील तर एका वृक्षाचे मागे दहा वृक्ष लावणे आवश्यक आहे. मात्र, न्यायालयाच्या बांधकामासाठी एक वृक्ष काढल्यास पन्नास वृक्ष लावा. आधी वृक्षारोपण करा त्य नंतर बांधकाम करा. “

### मुंबईत १५५ उच्च न्यायालयात पक्षकारांना बसण्यास जागा नाही

पंचवीस एकरावर न्यायालय होणार होते. मात्र, त्या पैकी चार एकर जागा राहिली आहे. पुणे न्यायिक जिल्हा भारतातील सर्वात मोठे न्यायालय आहे. राज्यात ५५ लाख ७६ हजार ७९० खटले प्रलंबित आहेत. ३१ टक्के खटले पाच वर्ष प्रलंबित आहेत सातशे ते आठशे न्यायाधीश आवश्यक आहेत.न्यायालयाचे विकेंद्रित केले पाहिजे.घटनेच्या मूलभूत तत्वाचे सामान्य माणसाला न्याय मिळत नसेल तर घटनेचा उपयोग काय.

### पुणे शहरातील कौटुंबिक न्यायालय आधुनिक न्यायालय आहे.

वकिलाने न्यायालय बंद करण्याचा किंवा न्यायालयावर बहिष्कार करू नये . १०० खटले असतील तर १००० खटल्यांना तारखा पडतात. निषेध घटनाह्य मार्गाचा अवलंब करू नये. नाहीतर वकिलांवर न्यायालयाचा अवमान केल्याचा गुन्हा दाखल करण्याची वेळ येऊ शकते असे न्यायमूर्ती ओके यांनी सांगितले

### शिवाजीनगर जिल्हा न्यायालयाचा खर्च दोन लाख रूपये

भांबुर्डा ( शिवाजीनगर) येथील जिल्हा न्यायालय इमारतीच्या बांधकामाला २४ नोव्हेंबर १९२३ रोजी सुरवात झाली. पाच वर्षानंतर ३१ ऑक्टोंबर १९२८ रोजी बांधकाम पूर्ण झाले. तर ५ नोव्हेंबर १९२८ रोजी न्यायालयाचे उद्घाटन झाले. बांधकामाला खर्च दोन लाख रूपये अपेक्षित होते. मात्र हा १९ लाख ५० हजार रूपये प्रत्यक्षात खर्च आला होता

# एकही व्यावसायिक नाटक न झालेले नाट्यगृह !

## येरवड्यातील आण्णाभाऊ साठे नाट्यगृहाला १३ वर्षे पूर्ण

येरवडा : येरवडा व पूर्व भागातील नागरिकांची नाटकाची भूक भागावी म्हणून गुंजन चौकात लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या नावाने महापालिकेने नाट्यगृह उभारले. या नाट्यगृहासाठी ग्रीकमधील अॅथन्स शहरातील स्थापत्यशास्त्राचा वापर केला गेला. ही वास्तू बाहेरून जेवढी भव्यदिव्य वाटते तेवढी नाटयप्रयोग सादर करताना तांत्रिकदृष्ट्या सदोष आहे. यासह राज्यभरात हाऊसफुल्लचा फलक लागणाऱ्या नाटकाला प्रेक्षक मिळतील का या भीतीने अनेक नाटक निर्मात्यांनी येथे नाटक लावण्याचे धाडस गेल्या बारा वर्षात केले नाही. त्यामुळे १२ कोटी रूपये खर्च करून बांधलेल्या नाट्यगृहात केवळ स्नेहसंमेलन, विविध राजकीय कार्यक्रम होत असल्याचे वास्तव आहे. येरवडा म्हटलं कि जेल व मनोरूग्णालय अनेकांच्या डोळयासमोर उभे राहते. ही प्रतिमा पुसण्यासाठी माजी नगरसेवक अॅड. अविनाश साळवे यांनी वीस वर्षांपूर्वी आण्णाभाऊ साठे नाट्यगृह बांधण्याचा संकल्प केला होता. नाट्यगृहाची वास्तू ही प्राचिन ग्रीक देशातील स्थापत्यशास्त्रावर आधारीत पाहिजे म्हणून त्यांनी आग्रह धरला. त्यासाठी त्यांनी महापालिका अधिकारी व अभियंत्याबरोबर ग्रीकचा दौरा केला. महापालिकेने बारा कोटी रूपये खर्च करून सुंदर अशी अथेन्सच्या घरतीवर वास्तू बांधली. मात्र या वास्तूंमध्ये अनेक त्रुटी होत्या. या त्रुटींची पुर्तता करता करता बारा वर्ष झाली तरी एकही व्यवसायिक नाटक येथे होऊ शकले नाही. येरवड्या सारख्या भागात प्रयोगाला प्रतिसाद मिळेल का बाबत नाट्य कलाकार व निर्मात्यांमध्ये संभ्रम असल्याचे नाट्यक्षेत्रातील काहींचे मत आहे. अनेकांना आण्णाभाऊ साठे नाट्यगृह म्हटले की सातारा रोडवरील का? असे म्हणतात तर प्रसिद्ध कलाकारांना येरवड्यातील साठे सभागृहाच माहित नसल्याचे त्यांच्या प्रतिक्रियेतून दिसल्याचे नाट्यरसिकांनी सांगितले.

अण्णाभाऊ साठे नाट्यगृहाचा पडदा काही तांत्रिकदोष असल्यामुळे बंद किंवा उघडत नव्हता. त्यामुळे संयोजकांची पंचायत होत असे. शाळा किंवा महाविद्यालयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थांची मोठी गैरसोय होत होती. नाट्यगृहातील पुढच्या रांगेतील प्रेक्षकांना कार्यक्रम पाहतांना व्यत्यय येत होता. प्रेक्षागृहाच्या गॅलरीतील सलग तीन रांगेतील प्रेक्षकांना कार्यक्रम पाहताना गैरसोईचे वाटत होते. स्टेज व्यवस्था, लाईट, लिफ्ट नाट्यप्रयोगासाठी सोईचे नव्हते. अशा एक ना दोन अनेक समस्या आता दूर करण्यात आल्या आहेत. आता प्रतिक्षा नाटकांची आहे. पण नाट्य निर्माते धोका पत्करण्यास तयार नाहीत.



> अण्णाभाऊ साठे नाट्यगृहाचा नुकताच पदभार स्वीकारला आहे. कोणत्या तांत्रिक कारणांमुळे व्यवसायिक नाटक होत नाही याची माहिती घेऊन त्याची पुर्तता केली जाईल.”
>
> - नंदा पवार , व्यवस्थापक,
> लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नाट्यगृह, येरवडा

# प्रत्येक अधिकारी कर्मचाऱ्याला मतदान प्रक्रियेतील सर्व टप्प्यांची सखोल माहिती असणे आवश्यक - अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे

पिंपरी, दि. २१ डिसेंबर २०२५ – महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रिया अचूक, पारदर्शक आणि कोणत्याही प्रकारच्या त्रुटीशिवाय पार पडणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी ईव्हीएमची हाताळणी, मॉक पोलची कार्यपद्धती, मतदान साहित्याचे व्यवस्थापन, मतदान केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्था तसेच मतदानानंतरची कार्यवाही या प्रत्येक टप्प्याची सखोल माहिती असणे आणि त्याची काटेकोर अंमलबजावणी होणे गरजेचे आहे, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी दिले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या अनुषंगाने दि. १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांचे दोन दिवसीय निवडणूक प्रशिक्षण चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात तीन सत्रांमध्ये पार पडले. या प्रशिक्षणादरम्यान मार्गदर्शन करताना अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे बोलत होते.

या प्रशिक्षणास सह आयुक्त मनोज लोणकर, उप आयुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह मुख्य प्रशिक्षक नरेंद्र बंड, रामेश्वर पवार, शिवाजी लाटे, संजीव आनंदकर, किशोर शिंदे, अमोल शिंदे, गणेश सुर्वे तसेच मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे म्हणाले, मतदान केंद्रांवर नियुक्त करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी हे प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी संपूर्ण निवडणूक यंत्रणेचा कणा असतात. त्यांच्या दक्षतेवर, समन्वयावर आणि निर्णयक्षमतेवर संपूर्ण मतदान प्रक्रियेची विश्वासार्हता अवलंबून असते. त्यामुळे प्रशिक्षण सत्रांना उपस्थित राहून प्रत्येकाने आपली भूमिका, जबाबदारी आणि अधिकार स्पष्टपणे समजून घ्यावेत, जेणेकरून मतदानाच्या दिवशी कोणताही संभ्रम किंवा अडथळा निर्माण होणार नाही.



प्रशिक्षणात संगणकीय सादरीकरणाच्या माध्यमातून प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी राबविण्यात येणाऱ्या संपूर्ण मतदान प्रक्रियेचे सखोल व टप्पानिहाय तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) ओळख करून देण्यात येऊन बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट यांची अचूक हाताळणी, परस्पर जोडणी तसेच त्यांची कार्यपद्धती स्पष्ट करण्यात आली. मतदान सुरू करण्यापूर्वी घेण्यात येणाऱ्या मॉक पोलची संपूर्ण प्रक्रिया, त्याची नोंदणी, तसेच मॉक पोलनंतर यंत्रे सील करण्याची कार्यवाही सविस्तरपणे समजावून सांगण्यात आली.

निवडणूक विषयक कायदेशीर तरतुदी, भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना, निवडणूक प्रक्रियेत करण्यात आलेले महत्त्वाचे बदल, टपाली मतदानाची अंमलबजावणी व त्यासंदर्भातील जबाबदाऱ्या याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मतदान प्रक्रियेतील विविध टप्पे, मतदानाच्या दिवशी वापरण्यात येणारे निवडणूक साहित्य ताब्यात घेणे, त्याची तपासणी करणे, साहित्य वितरण व स्वीकृतीची कार्यपद्धती, चिन्हांकित मतदार यादी तपासणी तसेच मतदान यंत्रांची पूर्वतपासणी कशी करावी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

याशिवाय मतदान केंद्र व मतदान कक्षांची उभारणी, मतदानाच्या आदल्या दिवशी करावयाची पूर्वतयारी, मतदान केंद्रांवर पोहोचल्यानंतर करावयाची कार्यवाही, मतदान केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्था, मतदानादरम्यान नियमांचे पालन तसेच मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर करावयाची अंतिम कार्यवाही याबाबत मुख्य प्रशिक्षक नरेंद्र बंड, रामेश्वर पवार, शिवाजी लाटे, संजीव आनंदकर, किशोर शिंदे, अमोल शिंदे, गणेश सुर्वे यांनी प्रत्यक्ष उदाहरणे आणि प्रात्याक्षिकांच्या आधारे उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## महाविकास आघाडी व महायुती आमनेसामने पण 'एमआयएम'मुळे समिकरण बिघडणार ?

पान १ वरून

शैलेंद्र भोसले , डॉ राजू आडागळे आदींमध्ये अनुसूचित जातींतून उमेदवारी मिळविण्यासाठी स्पर्धा सुरू आहे. खुल्या गटात संजय भासले ( शिवसेना ) , ज्ञानेश्वर मोझे ( भाजपा) समोरासमोर येण्याची शक्यता आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातून उमेदवारी न मिळाल्यास मुस्लिम समाजाचे इच्छुक उमेदवार एकत्र येऊन 'एमआयएम'च्या माध्यमातून पॅनेल तयार करण्याच्या प्रयत्नात असल्याचे समजते. या प्रभागात मुस्लिम मतदारांची संख्या अधिक व निर्णायक आहेत. हा प्रभाग धर्मनिरपेक्ष असल्यामुळे महाविकास आघाडीला अनुकूल आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून किशोर विटकर, हनीफ शेख, अक्षता राजगुरू, शैलेश राजगुरू, संतोष सुकाळे, नम्रता महाजन, तुषार महाजन, शशी गायकवाड, एजाज खान, सुरेखा बुलाखे, पूजा काटकर इच्छुक आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून अजित गंगावणे, रूपेश गायकवाड, शैलेश मोझे, शैलेंद्र भोसले, अरुण बेंगळे, अल्मास शेख, शैलेश मोझे, विजय घेणंद, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून संजय भोसले, राजेश वाल्हेकर, सिद्धान्त भालेराव इच्छुक आहेत. शिवसेनेकडून आनंद गोयल, सुहास कांबळे, सुश्मीता जाधव उमेदवारीसाठी प्रयत्न करीत आहेत. भाजपकडून ज्ञानेश्वर मोझे, अन्वर पठाण, शिल्पा राजगुरू, किशोर वाघमारे, सूरज दुबे, विकास सोनवणे, संध्या देवकर, दुर्गेश हातागळे, शैलेश हिरणवार उमेदवारी मागत आहेत. काँग्रेस पक्षाकडून ॲड अविनाश साळवे, विशाल मलके, अश्विनी लांडगे, संतोष आरडे, ज्योती चंदेवळ, निलोफर शेख इच्छुक आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून मनोज ठोकळ, रूपाली ठोकळ, महेश शिंदे, लक्ष्मण काते, अर्चना माचरेकर इच्छुक आहेत.

# निवडणूक प्रक्रियेसाठी पहिले प्रशिक्षण संपन्न

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ चा कार्यक्रम जाहीर झाला असून, १५ जानेवारी २०२६ रोजी या निवडणूकीसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या निवडणूक प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात पार पडले.

तीन टप्प्यात पार पडलेल्या या प्रशिक्षण सत्रास अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, निवडणूक निर्णय अधिकारी हणुमंत पाटील, दिप्ती सुर्यवंशी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी रविंद्र कुलकर्णी, प्रविण ढमाले, निवडणूक विभागाचे उप आयुक्त सचिन पवार, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य प्रशिक्षक नरेंद्र बंड, रामेश्वर पवार, शिवाजी लाटे तसेच मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

निवडणूक प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मतदान केंद्रावर रुजू होण्याआधी मतदान प्रक्रियेसाठी सर्व आवश्यक प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि इतर कर्मचारी मतदान केंद्रांवर



नियुक्त झाल्यानंतर त्यांना सर्व अधिकार प्राप्त झालेले असणार आहे, त्यामुळे या प्रक्रियेवेळी कोणतीही अडचण येऊन नये म्हणून प्रशिक्षणादरम्यान सर्व शंकांचे निरसण करून घ्यावे आणि वेळोवेळी आयोजित केले जाणाऱ्या प्रशिक्षण सत्रांना उपस्थित रहावे, असा सूचना अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी यावेळी उपस्थित अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिल्या.

या प्रशिक्षण कार्यक्रमात विशेष अधिकारी किरण गायकवाड यांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे महत्त्व अधोरेखित केले. मतदानाच्या दिवशी कामकाजात कोणताही तांत्रिक किंवा प्रशासकीय अडथळा येऊ नये, यासाठी प्रशिक्षणादरम्यानच सर्व शंकांचे निरसन करून घेणे आवश्यक आहे. तसेच सर्व नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांनी निवडणूक हे आपले राष्ट्रीय कर्तव्य समजून जबाबदारीने काम करावे आणि लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी हातभार लावावा असे सांगितले.

प्रशिक्षणात संगणकीय सादरीकरणाद्वारे (PPT) प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने ईव्हीएम, बॅलेट युनिट आणि कंट्रोल युनिट यांची जोडणी, मॉक पोल घेण्याची पद्धत, निवडणूक विषयक कायदेशीर तरतुदी, भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचना, निवडणुकीतील महत्त्वाचे बदल, निवडणुकीसाठी नियुक्त कर्मचारी मतदारांसाठी टपाली मतदान, मतदान प्रक्रियेतील टप्पे, निवडणूक साहित्य ताब्यात घेणे व तपासणी, साहित्य वितरण व स्वीकृती व्यवस्था, चिन्हांकित मतदार यादी तपासणी, मतदान यंत्र तपासणी, मतदान केंद्रांची उभारणी, मतदान कक्षाची उभारणी, मतदान केंद्रांवर आदल्या दिवशी करावयाची पूर्वतयारी, मतदान केंद्रांवर पोहोचल्यावर करावयाची कार्यवाही, मतदान केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्था, मतदान यंत्रांची जोडणी, मॉक पोल, मतदान संपल्यानंतर करावयाची कार्यवाही आदी बाबींचा समावेश होता.

याशिवाय, मतदान अधिकाऱ्यांची मतदान केंद्रावरील कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या याबाबत देखील माहिती विषद करण्यात आली. तसेच मतदान केंद्राध्यक्षांच्या मतदान केंद्र परीसरातील जबाबदाऱ्या, विविध टप्प्यांवरील कामांची रूपरेषा तसेच मतदान केंद्राध्यक्ष यांनी महत्त्वाच्या प्रकरणी करावयाची कार्यवाही आदी बाबींची माहिती देखील उपस्थितांना देण्यात आली. प्रशिक्षणाच्या शेवटच्या सत्रात ईव्हीएम, बॅलेट युनिट आणि कंट्रोल युनिट हाताळण्याबाबत सविस्तर प्रात्याक्षिक दाखविण्यात आले. यामध्ये रामेश्वर पवार, नरेद्र बंड, किशोर शिंदे, आनंदकर यांनी प्रशिक्षण दिले.

## मिना माने -इंगुळकर यांच्यावतीने महिलांसाठी हुरडा पार्टी

**धानोरी :** मीनाताई माने-इंगुळकर यांच्या वतीने कळस-धानोरी-लोहगाव येथील महिलांसाठी विशेष हुरडा पार्टी सहल आयोजित करण्यात आली. सहलीत विविध वयोगटातील महिलांनी उत्साहाने सहभाग घेतला. महिलांसाठीच खास ठेवलेल्या या उपक्रमात हुरड्याचा आस्वाद, खेळ, मनोरंजन आणि संवादाचे कार्यक्रम झाले. या उपक्रमामुळे येथील महिलांमध्ये मैत्री, एकोपा आणि सकारात्मकता वाढीस लागली.

या हुरडा पार्टी सहलीमागील मुख्य उद्देश प्रभागातील येथील महिलांना एकत्र आणून त्यांच्यातील एकोपा, सलोखा आणि परस्पर संवाद अधिक दृढ करणे हा होता. दैनंदिन घरगुती तसेच सामाजिक जबाबदाऱ्यांमधून थोडा विरंगुळा मिळावा, महिलांनी स्वतःसाठी वेळ द्यावा आणि आनंदाचा क्षण उपभोगावा, यासाठी हा उपक्रम खास आखण्यात आला. आनंदी वातावरणात एकत्र वेळ घालवल्यामुळे महिलांमध्ये आत्मीयता, मैत्री आणि सकारात्मकता वाढीस लागली आणि प्रभागात महिलांच्या सहभागाची एक नवी ऊर्जा निर्माण झाली.




**धानोरी : येथील सामाजिक कार्यकर्त्या मीना माने यांनी महिलांसाठी हुरडा पार्टीचे आयोजन केले होते.**

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ साठी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान

## अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रारंभिक प्रशिक्षण पूर्ण...

**पिंपरी, दि. २१ डिसेंबर २०२५ :** लोकशाही प्रक्रियेत मतदान हा अत्यंत महत्त्वाचा घटक असून, मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रांची रचना व व्यवस्था योग्य पद्धतीने असणे आवश्यक असते. यासाठी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी-कर्मचाऱ्यांनी मतदान केंद्रावर जाण्यापूर्वी देण्यात आलेले सर्व साहित्य नीट तपासून घेणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका २०२५–२६ यशस्वीपणे पार पाडण्यासाठी निवडणूक प्रक्रियेत मतदानाशी संबंधित सर्व नियम व कार्यपद्धती समजून घ्या. मतदान प्रक्रिया अचूक व सुरळीत पार पाडण्यासाठी मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांना आजचे प्रशिक्षण नक्कीच मार्गदर्शक ठरणार आहे असे प्रतिपादन उपायुक्त पंकज पाटील यांनी केले.

आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात महापालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५–२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेले अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रारंभिक प्रशिक्षण पार पडले. यावेळी मार्गदर्शन करतांना उपायुक्त पंकज पाटील बोलत होते.

तीन सत्रात पार पडलेल्या या प्रशिक्षणामध्ये प्रथम सत्रात आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात संगणकीय सादरीकरणाद्वारे मतदान प्रक्रियेचे सविस्तर प्रशिक्षण अधिकारी, कर्मचाऱ्यांना देण्यात आले. तर द्वितीय सत्रात प्रात्यक्षिकाद्वारे ईव्हीएम हाताळणीचे प्रशिक्षणही अधिकारी, कर्मचाऱ्यांना देण्यात आले. या प्रशिक्षणास अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य प्रशिक्षक सतीश मेहेर, अविनाश वाळुंज यांच्यासह संबंधित समन्वय अधिकारी तसेच मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

पुढे बोलताना उपायुक्त पंकज पाटील म्हणाले की, प्रशिक्षणादरम्यान १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदानाच्या वेळा, मॉक पोल प्रक्रिया, ईव्हीएम तपासणी, मतदानानंतरची कार्यवाही, बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीनुसार मतदान, नोटा पर्याय तसेच दिव्यांग व ज्येष्ठ मतदारांसाठीच्या सुविधांची माहिती उपस्थित मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकाऱ्यांना दिली.



पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका २०२५–२६ यशस्वीपणे पार पाडण्यासाठी निवडणूक प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या अचूकतेने आणि नियमानुसार पार पाडणे अत्यावश्यक आहे. मतदान केंद्रावर होणारी प्रत्येक प्रक्रिया पारदर्शक व नोंदवहीनुसार असावी, मतदान केंद्रावरील शिस्त, शांतता आणि प्रक्रियेतील पारदर्शकतेवर भर देत प्रत्येक टप्प्यावर नियमांचे पालन करणे किती महत्त्वाचे आहे, याबाबत मार्गदर्शन केले.तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांना दक्षतेने काम करण्याचे देखील उपायुक्त पंकज पाटील यांनी सूचित केले.

आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त व निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर आणि निवडणूक विभाग उपायुक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या प्रशिक्षणात निवडणूक कामकाजासाठी नियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांना या प्रशिक्षणाद्वारे निवडणूक प्रक्रियेबाबत सर्वंकष माहिती देण्यात आली. मुख्य प्रशिक्षक सतीश मेहेर व अविनाश वाळुंज यांनी मतदान केंद्रावरील कामकाजाची सविस्तर माहिती दिली. ईव्हीएम प्रात्यक्षिकासाठी आयटीआयचे जितेंद्र काथवटे, अरुण वाबळे, प्रवीण कोळेकर आणि योगेश गरड यांनी प्रत्यक्ष मार्गदर्शन केले.

प्रशिक्षण सत्रात मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांनी निवडणूक कायदा १९५१ अंतर्गत असलेल्या जबाबदाऱ्या, अधिकार व कर्तव्यांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान होणार असल्याने त्या अनुषंगाने मतदान केंद्राची तयारी, मतदान यंत्रांची (EVM) तपासणी, मॉक पोलची प्रक्रिया, मतदान सुरू होण्यापूर्वी व मतदान संपल्यानंतर करावयाची कार्यवाही याबद्दल देखील यावेळी माहिती देण्यात आली. तसेच बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीनुसार चार जागांसाठी मतदान होणार असून, प्रत्येक मतदाराने चार उमेदवारांना मतदान करणे आवश्यक असल्याची माहिती देण्यात आली. तसेच विविध रंगांच्या रिंग असलेल्या मतपत्रिकांच्या वापराबाबत, नोटा (वरीलपैकी एकही नाही) या पर्यायाबाबत आणि अंध व दिव्यांग मतदारांसाठी असलेल्या विशेष सुविधांबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

तीन सत्रांत पार पडलेल्या या प्रशिक्षणात पहिल्या सत्रात संगणकीय सादरीकरणाच्या माध्यमातून मतदान प्रक्रिया, मतदान केंद्राची पूर्वतयारी, निवडणूक कायदा व निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांची माहिती देण्यात आली. दुसऱ्या सत्रात ईव्हीएम यंत्रांच्या वापराबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवून यंत्र हाताळणीची सखोल माहिती देण्यात आली. तिसऱ्या सत्रात प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या शंका दूर करण्यात आल्या. या प्रशिक्षणामुळे मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी-कर्मचाऱ्यांना निवडणूक प्रक्रियेबाबत अधिक स्पष्टता मिळून आत्मविश्वास वाढल्याचे चित्र दिसून आले.

